# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**व्होकेशनल अभ्यासक्रमाचे रूपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाबाबत**

**(१) ८६ (०७-०४-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्होकेशनल अभ्यासक्रमाचे रूपांतर करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी मा.विधान परिषद सदस्य श्री.अनिल सोले, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ सप्टेंबर,२०१८ रोजी संयुक्त समिती स्थापन करून या समितीच्या शिफारशी प्रमाणे निर्णय घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.विधान परिषद सदस्य श्री.अनिल सोले, समितीचा अहवाल अप्राप्त असताना व्होकेशनल अभ्यासक्रमाचे रूपांतर करण्यासंदर्भात बैठक आयोजित करून पुढील कारवाई सुरू करण्याचा निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऐरोली, नवी मुंबई येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याबाबत**

**(२) २१३ (०७-०४-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराची लोकसंख्या १४ लाखांच्यावर असतांना तसेच एमआयडीसी, मिलिनियम बिझनेस क्षेत्र असूनही एवढ्या मोठ्या विभागासाठी बेलापूर येथे एकच औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नसल्यामुळे त्यांना पाहिजे त्या ट्रेड मधून शिक्षण घेता येत नाही त्यामुळे बेरोजगारीची समस्या वाढली आहे यासाठी ऐरोली एमआयडीसी परिसरात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२६-०६-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे .

(३) ऐरोली विभागात एमआयडीसी परिसरात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांमध्ये चुका झाल्याबाबत**

**(३) ३३८ (०९-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील उच्च व माध्यमिक शिक्षण मंडळाकडुन दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांमध्ये अधिक प्रमाणात चुका झाल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रमाणपत्रामध्ये चुक दुरूस्ती करीता चार-चार महिने विद्यार्थ्यांना विभागीय कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण मंडळाने तयार केलेल्या यादीत संबंधित शाळा मुख्याध्यापकांकडुन कालमर्यादेत नाव दुरूस्ती केली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शिक्षण मंडळाच्या गलथान कारभारामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याच्या दृष्टीकोणातून अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शानाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शिक्षण मंडळाने प्रमाणपत्रामध्ये चुका दुरूस्ती करीता कालमर्यादा निश्चित करून विनामुल्य व्यवस्था तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबनाची कारणे काय ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२६-०६-२०२०) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) (३) व (४) हे खरे नाही.
(५) नागपूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील काही शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रात त्रुटी निदर्शनास आल्यामुळे सदर प्रमाणपत्रे वाटप न करता ते जमा करुन सुधारित प्रमाणपत्रांचे संबंधितांना विनामुल्य वाटप करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणात कृषी पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी जाहिर करण्यात आलेली चॅम्पियन सेक्टर ही योजना अयशस्वी झाल्याबाबत**

**(४) ५३८ (०५-०४-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी कोकणात जाहीर करण्यात आलेला चॅम्पियन सेक्टरला ५ हजार कोटींचा निधी मंजूर होऊनही या योजनेत एकही प्रस्ताव अद्याप सादर झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वाधिक कृषी पर्यटन केंद्र कोकणात असतानाही शासनाकडे कृषी पर्यटनाला अधिकृत दर्जा नाही तसेच कृषी पर्यटनाबाबत नेमका आराखडा नसल्याने कृषी पर्यटन प्रस्तावाला परवानगी कोणी द्यावी याबाबतचा प्रश्न प्रशासन स्तरावर निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यटन व्यवसायिक एम.टी.डी.सी.ला नोंदणीकृत नसल्याने एम.टी.डी.सी.च्या माध्यमातून कृषी पर्यटन उद्योगासाठी तयार असलेली कृषी पर्यटन केंद्रे मंजूरी अभावी पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जागतिक स्तरावरील पर्यटक कोकणात आकर्षित व्हावेत, कोकणाला पर्यटन समृद्ध बनवावे, कोकणातील तरुणांनी नोकरीसाठी अन्यत्र जाण्यापेक्षा पर्यटन विषयक मार्गदर्शन त्यांना मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या चॅम्पियन सेक्टर ही योजना अपयशी ठरण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर योजना योग्य प्रकारे राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. आदित्य ठाकरे (३०-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजूरी दिलेल्या केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयाच्या "चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS)" मध्ये एकूण १२ सेवांचा समावेश असून त्यामध्ये "पर्यटन व आदरातिथ्य" ही एक सेवा समाविष्ट आहे. या अनुषंगाने पर्यटन विभागाकडून रु.१५८१.७५ कोटीचे प्रस्ताव केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयास पाठविण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS) या योजनेच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नसल्याचे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने कळविले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

प्रस्तावित कृषी पर्यटन धोरण शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजूरी दिलेल्या केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयाच्या "चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS)" मध्ये एकूण १२ सेवांचा समावेश असून त्यामध्ये "पर्यटन व आदरातिथ्य" ही एक सेवा समाविष्ट आहे. या अनुषंगाने पर्यटन विभागाकडून रु.१५८१.७५ कोटीचे प्रस्ताव केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयास पाठविण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS) या योजनेच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नसल्याचे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील रिक्त पदांबाबत

**(५) ५४५ (०७-०४-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया अंतर्गत कार्यरत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मंजूर ६ हजार ३२४ पदापैकी २ हजार ३६१ पदे अद्याप रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निर्देशकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२२-०६-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदांचा आढावा घेऊन आकृतीबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या सल्ल्याने सुरु आहे. आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सरळसेवेची रिक्त शिक्षकीय पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०९.०६.२०१७ अन्वये गठीत उप समितीसमोर सादर करण्यात आलेला होता. सदर समितीने दिनांक २७.०२.२०२० रोजी झालेल्या बैठकीत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सरळसेवेची ७०० रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तिय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामांबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत, वित्त विभाग शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२०२० मधील उपाय योजनांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये, असे नमूद केलेले आहे.

---

### "महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या" अभ्यासक्रमासाठी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(६) ६५९ (०९-०४-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने राज्य शासनाने 'महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना केली असून मुंबईतील काही शाळांनी या शिक्षण मंडळाची मान्यता मिळवून अभ्यासक्रम सुरू असतानाही २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी शाळांनी प्रवेश प्रक्रियाच घेतली नसल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी 'महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या' अभ्यासक्रमासाठी शाळांत प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली करण्यात वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२०) :** (१), (२) व (३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०२० अन्वये महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ रद्द करण्यात आले आहे. आता राज्यातील सर्वच शाळांसाठी नियमानुसार विहीत पध्दतीने प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येत आहे.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासकीय कार्यालयांसह विविध शासकीय कर्मचारी वसाहतींना दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(७) ६९३ (०५-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जीवन प्राधिकरणाच्या नळ योजनेतून शासकीय कार्यालयांसह विविध शासकीय कर्मचारी वसाहतींना दुषीत पाणी पुरवठा होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नळ योजनेच्या पाण्याचे शुध्दीकरण करण्याची मागणी वारंवार शासकीय कर्मचाऱ्यांकडून जिल्हा प्रशासनाकडे करुनही याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकारी व जलशुध्दिकरण करण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सिंधुदुर्गनगरी नळ पाणी पुरवठा योजनेचा उद्भव विहीर असून या विहिरीस लघु पाटबंधारे खात्याच्या तलावातून पाणी घेण्यात येते. उद्भवातून पाणी पंपाद्वारे ४ लक्ष लिटर्स क्षमतेच्या जलशुद्धिकरण केंद्रात आणले जाते व पाणी शुद्ध करुन ग्राहकांना पुरविण्यात येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सिंधुदुर्गनगरी परिसरात दिनांक २० ऑक्टोबर, २०१९ च्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे सदर पाणी पुरवठा योजनेचा उद्भव असलेल्या दाबाचीवाडी तलावाच्या पाण्यात काही प्रमाणात गढूळपणा आला होता. सदर बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सिंधुदुर्गनगरी कार्यालयाच्या निदर्शनास आल्यानंतर तुरटी (पी एसी) पावडरचे आवश्यक ते प्रमाण वापरुन योजनेतून दिनांक २३.१०.२०१९ पासून शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात आला. तद्नंतर योजनेतून अशुद्ध पाण्याचा पुरवठा झाल्याबाबत कोणतीही तक्रार नाही. सद्य:स्थितीत सदर नळ पाणी पुरवठा योजनेतून समाविष्ठ शासकीय कार्यालये, कर्मचारी वसाहत तसेच इतर ग्राहकांना शुद्ध व सुरळीत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(८) ७७७ (०७-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना विनाअट व विनाविलंब शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या मागण्या गत अनेक वर्षापासून शासनस्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांना तातडीने शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा मागील१५ वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याकरिता तसेच अंशकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्त्वावर नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण ठरविण्यासाठी मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. १६फेब्रुवारी, २०१८ अन्वये समिती गठीत करण्यात आली. या समितीने आपला अहवाल शासनास दि. ०६ सप्टेंबर, २०१८ रोजी सादर केला आहे. या अहवालातील शिफारशी, तसेच या समितीतील काही सदस्यांचे मत विचारात घेवून मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता, मंत्रीमंडळाच्या दि. ११/१२/२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार खालील शासन निर्णय / परिपत्रक निर्गमित करण्यात आलेली आहेत.

१) पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना सरळ सेवेने नियुक्तीसाठी वयोमर्यादा ५५ वर्षे शिथील करण्याबाबतचा शासन निर्णय दि. २ जानेवारी, २०१९ रोजी सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेला आहे,

२) पदवीधर अंशकालीन उमेदवारांपैकी जे उमेदवार शिक्षणशास्त्र पदवी / पदविकाधारक (B.Ed. /D.Ed.) आहेत त्यांना नियमित नियुक्ती होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा शासन निर्णय दि. १७ जून, २०१९ रोजी ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेला आहे.

(३) बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्ती देण्यासाठीच्या धोरणात बदल करुन पदवीधर अंशकालीन उमेदवाराना वैयक्तिकरित्या प्राधान्याने नियुक्तीबाबचे शासन परिपत्रक या विभागाने दि. २ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केले आहे.

उपरोक्त दि. २ मार्च, २०१९ व दि. १७ जून, २०१९ रोजीच्या शासननिर्णय / परिपत्रकानुसार पदवीधर अंशकालीन उमेदवारांना प्राधान्याने नियुक्ती देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना वेळोवळी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कुपोषणावर मात करण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणीबाबत

**(९) ८५३ (०५-०४-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील**

**(मुक्ताईनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषण व भूकबळीवर मात करण्यासाठी सहा वर्षापूर्वी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या अन्न सुरक्षा कायद्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सदरहू कायद्याची अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत तसेच सदर कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही. दि.२ फेब्रुवारी, २०१४ पासून राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) ग्रुप ग्रामपंचायत वाघेरी-मठखुर्द गावासाठी नळपाणी पुरवठा योजनेचे नुतनीकरण तसेच गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१०) ९८१ (०५-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) ग्रुप ग्रामपंचायत वाघेरी-मठखुर्द गावची लोकसंख्या २७५ एवढी असतांना गावासाठी २० वर्षापूर्वी कार्यान्वीयत असलेली नळपाणी पुरवठा योजना गावातील ग्रामस्थच चालवित असून सदर नळपाणी पुरवठा योजनेची नळजोडणी जूनी झाल्याने तसेच, गावाची लोकसंख्या वाढून ३५० पेक्षा झाली असल्याने गावाकऱ्यांना पाण्याचा तुटवडा निर्माण होत आहे, यासाठी सदर पाणी पुरवठा योजना नव्याने करुन पाईपलाईन, विहीरीची खोली वाढविणे व पाण्याच्या वितरण टाकीची क्षमता वाढविणे अशा प्रकारच्या मागण्या मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्याकडे ग्रामस्थांनी वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघेरी गावातील राष्ट्रीय पेयजल योजनेत व इतर कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहारा प्रकरणी वाघेरीचे तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक व अभियंता यांची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत असे आदेश सिंधुदुर्ग जिल्हयाचे तत्कालीन पालकमंत्री यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वाघेरी मठखुर्द ग्रामपंचायती अंतर्गत वाघेरी माळवाडी गावठणवाडीसाठी सन २०१४-१५ मध्ये पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे.
सदर योजनेच्या कामाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करण्यात आली. चौकशी अहवालानुसार वाघेरी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक याचे खुलासे मागविण्यात आले आहेत. खुलासे प्राप्त झाल्यावर नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच या कामावरील अभियंत्यावर दोषारोपपत्र निश्चित करुन त्यानुसार विभागीय चौकशीचा प्रस्ताव, सहायक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. अहवालानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ व कुळगाव (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र जीवन जलव्यवस्थापन प्राधिकरणाने नवीन पाणी जोडण्या बंद केल्याबाबत**

**(११) १०४० (०५-०४-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ व कुळगाव (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र जीवन जलव्यवस्थापन प्राधिकरणाने माहे मार्च, २०१६ पासून नवीन पाणी जोडण्या बंद केल्याने प्राधिकरणाचे सुमारे रुपये २२ कोटी ५० लक्ष रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने केलेल्या चौकशीअंती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या सर्व्हेनुसार माहे मार्च, २०१६ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत प्राधिकरणाचे कोट्यावधीचे नुकसान करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नवीन पाणी जोडण्याबंद करण्याचा लेखी आदेश काढणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (३१-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर विभागातील परिवहन विभागाद्वारे जादाभार वाहनाच्या मालकांकडुन गैरमार्गाने प्रवेश शुल्क घेतल्याबाबत**

**(१२) १०८९ (०९-०४-२०२०). श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील परिवहन विभागातील अधिकारी वाहनामध्ये प्रमाणापेक्षा जादाभार असलेल्या वाहन मालकांकडून प्रवेश शुल्काच्या रूपाने महिन्याभरात लाखो रुपयांची रक्कम घेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा विभागातून नागपूर विभागात बदली होऊन आलेले परिवहन अधिकारी श्री.नायक खान यांनी इतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाहन मालकांकडून जादा भारीत वाहनाकरीता बेकायदा प्रवेश शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०८-२०२०) :** (१) व (२) या आशयाची बातमी दि.०४.११.२०१९ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाली होती. तथापि, ओव्हरलोड वाहनाच्या मालकांकडून गैरमार्गाने एन्ट्री फी घेत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही तसेच श्री. नायक खान या नावाचा अधिकारी वा कर्मचारी नागपूर विभागातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिक्षण उपसंचालक कार्यालयाने ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे उल्लंघन केल्याबाबत**

**(१३) ११८६ (०९-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकरावी प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळावी या उद्देशाने राज्याच्या शिक्षण उपसंचालक कार्यालयातर्फे विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असता या फेरीत प्रवेश देताना ज्या उद्देशाने ऑनलाइन प्रकिया सुरु करण्यात आली त्या उद्देशालाच दुर्लक्षित करून ऑफलाईन पद्धतीने प्रवेश दिल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, आठव्या फेरीवेळी शिक्षण उपसंचालक कार्यालयाने ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पध्दतीचा अवलंब न करता थेट प्रवेशाचा अवलंब केल्याने न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२६-०६-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरिता उपाययोजना करण्याबाबत**

**(१४) १२१३ (०९-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने उर्दु एज्युकेशन बोर्डाची मान्यता कायम ठेवत पुढील कार्यवाही करण्याचे आदेश शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबत सापत्न वागणूक देत असल्याने अल्पसंख्याक समाजाच्या उच्च माध्यमिक आणि पदवीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशापासून विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२६-०६-२०२०) :** (१), (२) व (३) रिट याचिका क्रमांक ९७४०/ २०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने सदर मंडळाचे विद्यार्थी, मंडळ परीक्षेस बसणेसाठीच्या अटींची पूर्तता करीत असतील तर त्यांचे मंडळ परिक्षेचे आवेदनपत्र भरुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने सर्व विभागीय मंडळांना सूचित केले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहीलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात स्वस्त धान्य दुकानातून मुदतबाह्य तुरडाळ विक्री होत असल्याबाबत**

**(१५) १२४३ (०६-०४-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील काही स्वस्त धान्य दुकानांमध्ये मुदत संपलेल्या तूरडाळीची विक्री केली जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषी दुकानदारांवर आणि संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) येथील वक्फ बोर्डाच्या जमिनीवर प्रधानमंत्री आवास (घरकुल) योजना राबविण्याबाबत**

**(१६) १३२२ (०६-०४-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उस्मानाबाद शहरालगत असलेल्या वक्फ बोर्डाच्या मालकीची सुमारे ५०० एकर जमिन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमिनीवर अनेक वर्षापासून दारिद्रय रेषेखालील व इतर लोकवस्ती करुन राहत असून त्यापैकी ब-याच कुटुंबियांना राहण्यासाठी पक्की घरे नसून उक्त शहरातील वक्फबोर्डाच्या मालकिच्या नागरी वस्तीमध्ये नगर परिषदे मार्फत नागरीकांनाकडे मालकी हक्काचे कागदपत्र नसल्यामुळे पंतप्रधान आवास योजनेचा लाभ दिला जात नाही हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वक्फ बोर्डाच्या जागेवर वास्तव्यास असलेल्या स्थानिकांना उस्मानाबाद नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेतुन पक्की घरे बांधून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच, नगर परिषद उस्मानाबाद वक्फबोर्डाच्या मालकिच्या जागेतील नागरी वस्तीमध्ये सध्या कोणत्याही प्रकारची विकास कामे करत नसल्याने पावसाळयामध्ये मोठया प्रमाणात पाण्याचा साठा होऊन नागरीकांच्या घरामध्ये पाणी शिरते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उस्मानाबाद नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेतुन पक्की घरे बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकूला करिता उस्मानाबाद नगर परिषदेकडे एकूण किती नागरीकांनी अर्ज केले आहेत

(६) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२४-०७-२०२०) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय. वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये वक्फ जमीन मालकी हक्काने देण्याची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरील जागेवरील अतिक्रमणधारकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देता येणार नाही.

(३), (४) व (५) होय. उस्मानाबाद शहरातील लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीस अनुसरुन मा.मंत्री, अल्पसंख्याक विकास यांनी दि.२८.०१.२०२० रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये उस्मानाबाद शहरातील दर्गाह हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी व जामा मस्जीद या वक्फ संस्थेच्या वक्फ मंडळाच्या जमीनीवर असलेली कुटूंब संख्या, घरांची संख्या, त्यांच्या

ताब्यात असलेली जमीन, त्यांचे क्षेत्रफळ, घराचे क्षेत्रफळ, घराच्या बांधकामाचा प्रकार, वक्फ मंडळाची रिकामी जागा, घरपट्टी किती रहिवाश्याकडून प्राप्त होते, सदर जमीनीचा रेडी रेकनर दर, विकास आराखडयानुसार वक्फ मंडळाच्या किती जागेवर आरक्षण येत आहे या बाबत नगर परिषद उस्मानाबाद यांनी सविस्तर अहवाल सादर करावा असे निदेश दिले आहेत. तसेच सदर अहवाल सादर करण्याबाबत नगरपरिषदेस वक्फ मंडळाकडून पत्र देण्यात आलेले आहे. नगर परिषदेकडून सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर वक्फ मंडळाकडून याबाबत उचित निर्णय घेण्यात येणार असल्याचा अहवाल वक्फ मंडळाने सादर केला आहे. सदर जागेवर घरकूल बांधून देण्याबाबत १८०० नागरिकांनी अर्ज केला असल्याचा अहवाल नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विक्रोळी पार्कसाईट (विक्रोळी, मुंबई) येथे शालेय पोषण आहारातील तांदूळ काळ्याबाजारात विकल्याबाबत

**(१७) १३३४ (०९-०४-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पार्कसाईट परिसरातील दुकानातून शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्य शासनाकडून पुरविण्यात येणा-या तांदूळाची काळ्या बाजारात विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पार्कसाईट पोलीसांनी तिघांना अटक करुन त्यांच्याकडून १९८७ किला तांदळाचा साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेतील तांदूळ काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या व्यक्तींची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली व यापुढे असे प्रकार घडू नयेत यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) गुन्हे प्रकटीकरण शाखा, घाटकोपर यांनी केलेल्या कारवाईमध्ये अंबिका धान्य भंडार या दुकानामध्ये ११८७.५ किलो तांदूळ आढळून आला आहे. संबंधित धान्य विक्री करणाऱ्या दुकानदारावर कारवाई करण्याची प्रक्रिया पोलीसांमार्फत सुरु आहे. तांदळाचा प्रत्यक्ष खप कमी होत असल्यामुळे योजनेंतर्गत प्राप्त होणारा प्रति दिन प्रति विद्यार्थी तांदूळाचे प्रमाण कमी करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला आहे. तसेच, शाळेत शिल्लक असलेला तांदुळ विद्यार्थांना समप्रमाणात वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या चौथीच्या पुस्तकातून**
**शिवाजी महाराजांचा इतिहास हद्दपार केल्याबाबत**

**(१८) १७३० (०८-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांना स्थानिक संस्कृती जपत आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून स्थानिक भाषा माध्यमातील शाळांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ शासनाने स्थापन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाने इयत्ता चौथीसाठीच्या माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान छापण्यात आलेल्या पुस्तकातून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वगळण्यात आला असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इयत्ता चौथीसाठीच्या पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास भविष्यात कधीही न बदलण्याबाबतचा विधीमंडळाचे उभय सभागृहात सन १९९१ मध्ये तसा ठराव देखील संमत करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे. सन १९९२-९३ पासून सुरू होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यासक्रम ठेवण्यात येणार असल्याचे निवेदन विधीमंडळात करण्यात आले होते.

(४) नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम सुधारण्यात येणार असून याबाबत यापुढे योग्य काळजी घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात अपघाती मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१९) १७५१ (०८-०४-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात १९९० विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यु झाला असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने या अपघाती मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या किती पालकांना आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-०७-२०२०) :** (१) राज्यात सन २०१८-१९ या वर्षात अपघाती मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ११६६ इतकी आहे.

(२) अपघाती मृत्यू पावलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाने आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात आय.टी.आयच्या प्रवेश प्रक्रियेत जागा शिल्लक राहिल्याबाबत

**(२०) १८३४ (२३-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योगजता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १० वी नंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील आयटीआय डिप्लोमा अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेत २९.९५९ जागा रिक्त राहिल्या असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावतील रिक्त जागांची संख्या २.१६२ इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार आयटीआय मध्ये अधिकाधिक विदयार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२६-०६-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, रिक्त राहिलेल्या जागांचा आढावा घेण्यात आला असून त्यानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेशप्रक्रीयेत उमेदवारांचा अधिकाधिक प्रतिसाद लाभण्यासाठी

विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत असते. तसेच दुर्गम भागातील उमेदवारांसाठी विशेष "प्रवेश प्रोत्साहन अभियान" राबविण्यात येते.

(४) लागू नाही.

---

**अमरावतीतील अनेक जिल्हयात भूगर्भातील पाणीपातळीत घट झाल्याबाबत**

**(२१) १८७९ (१४-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी अनेक भागात समाधानकारक पाऊस झाला असला तरी भूगर्भातील पाणीपातळीत वाढ न होता २६८ तालुक्यांतील सुमारे ९ हजार ३५५ गावांतील पाणीपातळी एक मीटरहून अधिक खोल गेली असल्याचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील पाणी पातळीत घट झालेल्या २४६ गावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गावांत पाणीवापर, उपसा व उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०८-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

माहे सप्टेंबर, २०१९ अखेर राज्यातील ३५५ पैकी २१३ तालुक्यामध्ये सरासरीएवढा पाऊस झाला होता व १४२ तालुक्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत घट आढळली होती. त्यानुसार माहे सप्टेंबर, २०१९ अखेर निरीक्षण विहीरीद्वारे मोजण्यात आलेल्या भूजल पातळीच्या अभ्यासाद्वारे राज्यातील ९३५५ गावांमध्ये सरासरीच्या तुलनेत १ मीटरपेक्षा जास्त भूजल पातळी खालावलेली आढळली. तथापि, माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या पावसामुळे राज्यातील ३५५ पैकी २५२ तालुक्यांमध्ये पावसाने सरासरी गाठली व १०३ तालुक्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत घट आढळली. त्यापैकी ८७ तालुक्यांमध्ये ० ते २० टक्के घट व १६ तालुक्यांमध्ये २० टक्के पेक्षा जास्त घट आढळली. पावसामध्ये सरासरीच्या तुलनेत १ मीटरपेक्षा जास्त घट आढळून आलेल्या १६ तालुक्यातील ज्या गावांमध्ये भूजल पातळी सरासरीच्या तुलनेत १ मीटरपेक्षा जास्त खोल आढळली, अशा ६८९ गावांमध्ये पाणी टंचाईची शक्यता माहे ऑक्टोबर,२०१९ अखेरीस संभाव्य पाणी टंचाई अहवालात दर्शविण्यात आली होती.

जानेवारी, २०२० अखेरीस निरीक्षण विहीरींमधील भूजल पातळीच्या घेतलेल्या नोंदीची तुलना मागील ५ वर्षाच्या जानेवारी मधील भूजल पातळीच्या सरासरीशी केली असता राज्यातील ५४७५ गावांमध्ये सरासरीच्या तुलनेत १ मीटरपेक्षा जास्त भूजल पातळी खालावलेली आढळली. अर्थात माहे सप्टेंबर, २०१९ नंतर झालेल्या पर्जन्यमानामुळे १ मीटरपेक्षा जास्त भूजल पातळी खोल गेलेल्या गावांची संख्या ९३५५ वरून ५४७५ इतकी कमी झाली आहे.

(२) नाही.

माहे सप्टेंबर, २०१९ अखेर घेण्यात आलेल्या भूजल पातळीच्या नोंदीनुसार अमरावती विभागातील ५६ तालुक्यातील १६३५ गावांमध्ये भूजल पातळीमध्ये १ मीटर पेक्षा जास्त घट झाल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, माहे ऑक्टोबर, २०१९ व त्यानंतर झालेल्या चांगल्या पावसामुळे माहे ऑक्टोबर, २०१९ अखेर अमरावती जिल्ह्यातील ६ तालुक्यातील १६३ गावांमध्ये पाणी पातळी वरीलप्रमाणे घटली असून टंचाईची संभाव्यता पाणी टंचाई अहवालात दर्शविण्यात आली होती.

(३) संभाव्य पाणी टंचाई अहवालामध्ये अनुमानित केलेल्या अमरावती विभागातील १६३ गावांपैकी ४३ गावांचा समावेश संबंधित जिल्हा परिषदेच्या पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये झालेला आहे. या ४३ गावांमध्ये टंचाई निर्मुलनासाठी नवीन कूपनलिका, विहीर अधिग्रहण आणि नाळ पाणी पुरवठा विशेष दुरूस्ती या उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दाटेगाव (ता.जि.हिंगोली) ग्रामस्थांना पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीचे पाणी अशुद्ध झाल्याबाबत**

**(२२) २१३५ (०६-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाटेगाव (ता.जि.हिंगोली) ग्रामस्थांना पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीचे पाणी अशुद्ध असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दाटेगाव परिसरातील नागरिकांना पिण्यायोग्य पाणी नसल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने दाटेगाव विहीरीचे पाणी शुद्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत व जिल्हा परिषदला कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दाटेगावासाठी डिग्रसा करावे येथील जलशुद्धी केंद्रातून पाणी पुरवठा होत असतानाही पाणी पुरवठा बंद असल्याने ग्रामस्थांना विविध आजारांच्या समस्या निर्माण झाल्या आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०८-०७-२०२०) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) व (३) विहिरीचे पाणी अशुध्द असल्याचे लक्षात आल्यावर दाटेगांव येथे गावांमधील त्या विहिरींचे पाणी तात्काळ ३३% क्लोरिन युक्त TCL पावडरद्वारे जलसुरक्षकामार्फत शुध्दीकरण करण्यात येवून शुध्द पाणी पुरवठा करण्यात आला. तसेच त्यानंतर उद्वरण नलिकेची ग्रामपंचायत मार्फत तात्काळ दुरूस्ती करून डिग्रस क-हाळे येथील जलशुध्दीकरण केंद्रातून शुध्द पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना कोणत्याही जलजन्य आजाराची समस्या उद्वभवलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्वभवत नाही.

---

**राज्यातील शाळांमधील (आयसीटी) शिक्षकांना करार संपल्याने कार्यमुक्त करण्यात आल्याबाबत**

**(२३) २५६७ (०९-०४-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये २००८ पासून सर्व शिक्षा अभियानांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या आठ हजार माहिती, संपर्क आणि तंत्रज्ञान (आयसीटी) शिक्षकांना करार संपल्याने कार्यमुक्त करण्यात आल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी विभागाकडे मार्गदर्शनासाठी लिहिलेल्या पत्राला उत्तर देताना समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना नियमित कामावर घेण्याबाबत संबंधित राज्यांनी त्यांच्या धोरणानुसार योग्य तो निर्णय घ्यावा अशी सूचना केंद्रीय मनुष्यबळ विकास विभाग यांनी संबंधित राज्यांना दिल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिक्षकांना नियमित नियुक्ती देण्याबाबत शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०७-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) ICT instructors हे संबंधित खाजगी कंपनीचे कंत्राटी कर्मचारी आहेत, म्हणून त्यांच्या सेवांचा विषय संबंधित खाजगी कंपनीचा आहे. ५ वर्ष संपल्यानंतर संबंधित शाळेला हस्तांतरित करण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळा, संबंधित शाळेतील नियमित प्रशिक्षित शिक्षकांमार्फत चालविणे अपेक्षित आहे. त्यामुळे कंत्राटी तत्वावरील ICT प्रशिक्षकांच्या सेवा संबंधित संस्थांनी संपुष्टात आणल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पंप ऑपरेटर/प्लंबरचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२४) २८१६ (२३-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पंप ऑपरेटर व प्लंबरचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२४-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सन्माननीय लोकप्रतिनिधी यांना दिनांक २८.०१.२०२० च्या पत्राद्वारे शिकाऊ उमेदवारी योजनेसंदर्भातील सद्य:स्थिती संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांच्या स्तरावरुन कळविण्यात आलेली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील खाजगी शाळांमध्ये आरक्षीत असलेल्या २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशाकरिता वेबसाईटवरील नमुना फॉर्ममध्ये त्रुटी असल्याबाबत**

**(२५) २८६० (०८-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळांमध्ये आरक्षीत असलेल्या २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश घेताना आईचे नाव लिहिण्यासाठी वेबसाईटवरील नमुना फॉर्म मध्ये रकानाच नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात अनेक सामाजिक शिक्षण संस्थांनी तसेच इतर संघटनांनी तशी लेखी निवेदने मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचेकडे दिली आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरचा रकाना नसल्यामुळे अर्ज भरताना विद्यार्थ्यांना तसेच पालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयातील १ लाख ५२ हजार ७३९ बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) २८७० (०७-०४-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील सन २०१६ ते २०१९ या कालावधीत १ लाख ५२ हजार ७३९ बेरोजगार तरुण-तरुणींनी शासनाकडे रोजगारासाठी नोंदणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नोंदणी केलेल्या बेरोजगार तरुण-तरुणींपैकी केवळ ५ हजार ३६७ बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील बेरोजगारांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सन २०१६ ते सन २०१९ या कालावधीत २६,९८० बेरोजगारांनी नाव नोंदणी केलेली असून, क्रमवर्धीत नोंदणीपटावरील संख्या ४८,०९५ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१६ ते सन २०१९ या कालावधीत १२,४३२ इतके बेरोजगार नोकरीस लागले आहेत.

(३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे ही राज्य शासनाची रोजगार व स्वयंरोजगारासाठी मदत व मार्गदर्शन करण्याकरिता असलेली यंत्रणा आहे. रोजगारनिर्मिती हा यंत्रणेच्या कार्य कक्षेत येत नाही.

तथापि, बेरोजगारी दूर होण्याच्या दृष्टीने (१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे संगणकीकरण, (२) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे, (३) रोजगार मेळावे आयोजित करणे, (४) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, (५) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र, (६) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (ईपीपी), (७) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे, (८) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, (९) शिकाऊ उमेदवारी योजना, तर स्वयंरोजगारासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत (अ) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, (ब) गट कर्ज व्याज परतावा योजना, (क) गट प्रकल्प योजना या योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सर्व शिक्षा अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(२७) २९५१ (०८-०४-२०२०). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद, महानगरपालिका, DIECPD, म.प्रा.शि.प. मुंबई येथे जवळपास ६००० कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून सदर कर्मचारी १० ते १५ वर्षापासून शासकीय सेवेत सामावून न घेतल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणायत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विविध जिल्हयांतील पर्यटनस्थळांचा विकास करण्याबाबत**

**(२८) ३६३९ (०७-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यटन विकास महामंडळातर्फे राज्यातील विविध जिल्हयातील ३२० पर्यटन स्थळांचा विकास करण्याचा निर्णय घेऊन सन-२०१९ च्या अर्थसंकल्पात सुमारे रुपये १२० कोटी मंजूर केले होते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निर्णयानुसार राज्यातील ३२० पर्यटन स्थळांचा शोध घेऊन त्यांचा विकास करणे तसेच राज्यातील दुरवस्था झालेल्या किल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत राज्यातील किती पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (३०-०६-२०२०) :** (१), (२) व (३) राज्यातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये "विविध ठिकाणी पर्यटन विकासासाठी मूलभूत सुविधांकरिता अनुदान (३४५२ १९५८)" या लेखाशिर्षाखाली एकूण रु.२९५.३५ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झाली होती. त्यापैकी माहे डिसेंबर, २०१९ अखेर पर्यंत ६०% म्हणजेच रु.१७७.२१ कोटी तरतूद खर्चासाठी उपलब्ध झाला होती. उपलब्ध झालेल्या रु.१७७.२१ कोटी निधीमधून माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये तत्कालीन मा. मंत्री (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य पर्यटन विकास समितीने मान्यता दिलेल्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत नवीन व जुन्या

(स्पिलओव्हर) कामांसाठी रु.१७६.६२ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. यामध्ये साधारणपणे १८७ नवीन कामांचा तर १६४ जुन्या कामांचा समावेश आहे. यामधील काही कामे राज्यातील किल्ले परिसर विकासाशी संबंधित आहेत.

---

**राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत**

**(२९) ३८५१ (०७-०४-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणा-या एसबीसी/ओबीसी/व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत सोमया प्रायव्हेट आयटीआय, चंद्रपूर यांनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (३०-०६-२०२०) :** (१) सोमया प्रायव्हेट आयटीआय, चंद्रपूर यांनी प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत शासनाकडे मागणी केलेली नाही.

(२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये केंद्रिय पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती देण्याबाबत दि. २९ मे, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत सामाजिकदृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विदयार्थी, अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गातील विदयार्थी यांचा समावेश समावेश करण्यात आलेला आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गाकरीता शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील विशेषत: अमरावती जिल्हयातील अंत्योदय योजनेचे लाभार्थी शासनाच्या अनेक लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(३०) ३८९७ (१४-०४-२०२०). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अमरावती जिल्ह्यातील दिव्यांग, निराधार, विधवा, कुष्ठरोगी, अल्पभूधारक शेतकरी व दारिद्रय रेषेखालील शेतकरी, एक किंवा दोन सदस्य संख्या असलेले लाभार्थी शासनाच्या अंत्योदय योजनेच्या अनेक लाभापासून वंचित असल्याने लोकप्रतिनिधींनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या तक्रारीवरून जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सचिव, अन्न नागरी पुरवठा विभाग, मुंबई यांना दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी उक्त लाभार्थ्यांना सदर योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन निर्णय काढण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-०७-२०२०) :** (१) होय.

दिव्यांग, निराधार, विधवा, कुष्ठरोगी, कमी संख्या असलेले लाभार्थी अंत्योदय अन्न योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रहार जनशक्ती पक्ष यांचे दि. १३.१२.२०१९ चे पत्र जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांना प्राप्त झाले आहे.

(२) व (३) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका ३५ किलो अन्नधान्य तर प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्य वितरीत करण्यात येते. १ किंवा २ सदस्यांसाठी ३५ किलो अन्नधान्य आवश्यकतेपेक्षा जास्त असून त्यांना अंत्योदय अन्न योजनेची शिधापत्रिका देणे उचित वाटत नसल्याने सदर लाभार्थ्यांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये वर्ग करून ५ किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबाचा अंत्योदय अन्न योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासन पत्र दि. २१.९.२०१७ अन्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निदेश दिले आहेत. तसेच, सदर कार्यवाही करताना मा.न्यायालयांच्या कोणत्याही आदेशांचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत दि.२४.१०.२०१७ च्या शासन पत्रान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

दि. ८.१.२०२० च्या शासन पत्रान्वये अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांवरील सदस्य प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये वर्ग करण्याबाबत सुधारीत सूचना देण्यात आल्या असून त्यानुसार दि. १७.७.२०१३ च्या शासन निर्णयान्वये अंत्योदय अन्न योजनेकरिता पात्र ठरविण्यात आलेल्या व्यक्ती/कुटुंबांव्यतिरिक्त इतर व्यक्ती/कुटुंबांना वितरीत करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांकरीता दि. २१.९.२०१७ व दि. २४.१०.२०१७ च्या शासन पत्रांमधील सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन नियमावली करण्याबाबत

**(३१) ३९३८ (०८-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी नवीननियमावली करण्यात आली असून नियमावली मध्ये शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना २५% जागांवर देण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत बदल करून तीन टप्प्या ऐवजी एकाच टप्प्यात सोडत काढून प्रवेश देण्यात येणार असल्याचा बदल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, नियमावलीत केलेल्या बदलानुसार प्रत्येक जिल्ह्यात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत २५% अंतर्गत जागा उपलब्ध आहेत तेवढ्याच जागांची यादी तयार करून प्रवेश देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, प्रतीक्षा यादी नसल्याने निवड यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशा अभावी रिक्त असलेल्या शाळेतील जागा भरण्याकरिता शासनाकडून कोणते नियोजन करण्यात आले आहे, वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) या वर्षापासून २५ टक्के अंतर्गत जेव्हढ्या जागा उपलब्ध आहेत तेवढीच निवड यादी व तेवढीच प्रतीक्षा यादी ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्हा उपप्रादेशीक परीवहन कार्यालयात गैरप्रकार होत असल्याबाबत

**(३२) ४१२६ (०९-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ उपप्रादेशीक परिवहन कार्यालयामध्ये ऑनलाईन प्रक्रीया असली तरी अनेकदा बाहेरील जिल्हयातून खरेदी करण्यात आलेल्या वाहन नोंदणीचा विलंब झाल्यास शुल्क आकारले जात असून हे शुल्क भरण्याऐवजी किंवा ते कमी करण्यासाठी थेट पैशाची मागणी होत असल्याचे दिनांक २० डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एजंट व खासगी कर्मचा-यांचा हस्तक्षेप सर्वाधिक होत असल्याचे वाहनधारकाच्या निवदेनावरून निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे व चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रादेशीक कार्यालय यवतमाळ येथील परिवहन विभागातला कार्यभार सुरळीत व्हावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०८-२०२०) :** (१) व (२) नाही.

या आशयाची बातमी दि.११ नोव्हेंबर २०१९ रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाली होती. तथापि, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून विलंबाने नोंदणीकरिता

आलेल्या वाहनांकडून विहित शुल्काव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क घेतले जात नाही.

कार्यालयीन कामकाज करत असताना कोणत्याही खाजगी व्यक्तीचा वापर करु नये अशा सूचना उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ यांनी दि.२७.११.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पोषण आहार करणाऱ्या महिला बचत गटांचे खिचडी तयार करण्याचे दर वाढविण्याबाबत**

**(३३) ४१४२ (०९-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोषण आहार करणाऱ्या महिला बचत गटांना एक किलो खिचडी तयार करण्याकरिता १० रुपये दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची वाढती महागाई पाहता सदरचे दर वाढविण्याबाबत शासनाने काही निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप व भूमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०८-२०२०) :** (१), (२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागातील शाळांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्यात येतो. काही संस्था प्रति विद्यार्थी फार कमी प्रमाणात आहार पुरवतात, अशा तक्रारी वेळोवेळी प्राप्त होतात. तसेच, आहाराचा पुरवठा करणाऱ्या संस्थामार्फत अपेक्षित वजनाच्या निकषानुसार तयार आहाराचा पुरवठा होत नसल्याची बाब निदर्शनास आल्याने, सदर संस्थांनी पुरवठा केलेल्या शिजविलेल्या आहाराच्या वजनाच्या प्रमाणानुसार त्यांना देयके देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार केंद्र शासनाने निश्चित केलेल्या प्रतिदिन प्रति विद्यार्थी आहार खर्च व तांदूळ यांच्या प्रमाणानुसार शिजविलेल्या अन्नाचे दर निश्चित केले आहेत. केंद्र शासनाने आहार खर्चात वाढ केल्यास त्याप्रमाणात शिजविलेल्या अन्नाच्या पुरवठ्याचे दर वाढणार आहेत.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या महिला मदतनीस (स्वयंपाकी) यांना तुटपूंजे वेतन मिळत असल्याबाबत**

**(३४) ४१४८ (०९-०४-२०२०). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या महिला मदतनीस (स्वयंपाकी) यांना गत १५ वर्षापासून १५०० रु.इतके तुटपुंजे वेतन दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढया कमी वेतनावर सदर महिला मदतनीसांना काम करावे लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर बाब लक्षात घेता प्राथमिक शाळांमधील महिला मदतनीस यांच्या वेतनवाढीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०८-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सध्या कोरोना महामारीच्या कालावधीत सर्व शाळा बंद असल्यामुळे सदर मदतनीस यांना आहार शिजविण्याचे कोणतेही काम नाही.
(३) व (४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी व मदतनीस यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबतची मागणी केंद्र शासनाच्या प्रस्ताव मान्यता मंडळाच्या (PAB) बैठकीत करण्यात आली होती. तथापि, सदर मागणी मान्य करण्यात आलेली नाही.

---

**आंबेजोगाई (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील गैरव्यवहाराबाबत**

**(३५) ४४०५ (०९-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहन चालवण्याचा परवानाच्या ऑनलाइन परीक्षा पास होण्यासाठी विशिष्ट रक्कम घेतली जाते, हे खरे आहे काय,
(२) तसेच, परीक्षा ऑनलाइन सीसीटीव्ही कॅमेरा समोर घेणे आवश्यक असताना उक्त कार्यालयातील बंद टीव्हीसमोर परीक्षार्थीना व इतरांना बसवून परीक्षेत पास करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, परवान्यासाठी वाहन चालविण्याची चाचणी घेणे आवश्यक असताना अशी चाचणी घेतली जात नाही व वाहनांचे फिटनेस कार्ड काढण्याकरिता आर्थिक गैरव्यवहार केला जात असल्याने याप्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी याकरिता स्थानिक नागरिकांनी व सामाजिक संघटनेने २०१९ मध्ये अंबाजोगाई येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
असल्यास चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबधीतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०८-२०२०) :** (१) व (२) नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,अंबाजोगाई (जि.बीड) येथे दि.१४.०३.२०१७ पासून अनुज्ञप्ती संदर्भातील सर्व कामे ही सारथी ४.० या संकेतस्थळावरुन केली जातात यामध्ये अर्जदार ऑनलाईन अर्ज भरुन,महत्वाची कागदपत्र अपलोड करुन व ऑनलाईन शुल्क भरणा करुन त्याच्या सोईच्या दिवशी अपॉइंटमेंट घेऊ शकतो. त्यानुसार संगणकीय परिक्षेमध्ये ६० टक्के प्रश्नांची उत्तरे दिल्यास त्यास शिकाऊ अनुज्ञप्ती दिली जाते. त्यासाठी विहित शुल्काशिवाय कोणतीही अतिरिक्त रक्कम घेतली जात नाही. तसेच सद्यस्थितीमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,अंबाजोगाई येथील सर्व सीसीटिव्ही कॅमेरे रेकॉर्डींगसह चालू आहेत.

(३) होय,भारतीय जनता युवा मोर्चा,अंबाजोगाई यांनी दि.१८.१२.२०१९ रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,अंबाजोगाई येथे निवेदन दिले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील बेरोजगार तरुणांना उद्योगासाठी कर्ज देण्याबाबत**

**(३६) ४५०१ (०७-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून पंढरपूर (जि.सोलापूर) येथील बेरोजगार तरुणांना उद्योगासाठी कर्ज देताना राष्टीयकृत बँकांकडून अडवणूक केली जात असल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या माध्यमातून मदत देण्याचे प्रयत्न शासन करीत असताना बँकांमार्फत कर्ज मिळविण्यासाठी अडवणूक होत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, महामंडळाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष हे जिल्हयांच्या दौऱ्यावर असतांना, संबंधित जिल्हा व तालुक्यातील बँक अधिकाऱ्यांना कर्ज प्रकरणे विहित कालावधीमध्ये निकाली काढण्याबाबत सूचना करतात तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या दरमहा होणाऱ्या बँकेच्या बैठकीदरम्यान महामंडळाच्या योजनांचा आढावा घेण्याच्या सूचनाही दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली शहरातील (जि.हिंगोली) किराणा दुकानावर शालेय पोषण आहारातील डाळींची विक्री झाल्याबाबत

**(३७) ४६१९ (१०-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) शहरातील राम गल्लीतील एका किराणा दुकानावर शालेय पोषण आहारातील मुग व मसूरडाळ विक्री होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर डाळ किराणा दुकानात कोणत्या शाळेतून आली तसेच कोणत्या व्यापा-यांकडून आली याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर डाळ तेजमल शर्मा रा. रामगल्ली, हिंगोली यांच्या किराणा दुकानातून जप्त करण्यात आली आहे. तथापि, सदर डाळ कोणत्या शाळेतून आली हे अद्याप चौकशीमध्ये निष्पन्न झालेले नाही.

सदर प्रकरणी गु.र.नं. ६९१/१९ कलम ४२०, ३४ भा.दं.वि. सहकलम ३, ७ जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ प्रमाणे पो.स्टे. हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बुलढाणा यांच्याकडून होत असलेली अनियमितता

**(३८) ४७०० (१०-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हे बुलढाणा येथील अधिकारी सौ.जयश्री दुतोंडे यांच्याकडे (जी. फॉर्म) नावाच्या स्वरुपात लाच मागत असून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याबाबतची मागणी आयुक्त (परिवहन), महाराष्ट्र राज्य परिवहन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे क्राईम इंटेलिजन्सी पब्लीक असोसिएशन यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०८-२०२०) :** (१) होय.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांनी चौकशी केली असून त्यांनी याबाबतचा अहवाल दि.१९.०२.२०२० रोजी परिवहन आयुक्त यांना सादर केला आहे. सदर अहवालानुसार तक्रारदाराच्या तक्रारीत तथ्य आढळून आले नसल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर तक्रार गैरसमजूतीमधून केल्यामुळे सशर्त मागे घेत असल्याबाबत तक्रारदार यांनी पत्र दिले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील पदवीधर अंशकालीन यांना कंत्राटी तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(३९) ४९८४ (०७-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अन्य जिल्हयामध्ये काही विभागात पदवीधर अंशकालीन यांना शासन निर्णय दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार कंत्राटी तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया सुरू असून अद्यापपर्यंत बुलढाणा जिल्हयात ही प्रक्रिया मंदावलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
तथापि, दि.२७ जानेवारी, २०२० रोजी अप्पर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे अध्यक्षतेखाली प्रत्येक कार्यालयाच्या रिक्त पदांबाबतचा आढावा घेण्यात आला, पदे भरण्याबाबतच्या अडीअडचणींचा विचार करण्यात आला व सदरची रिक्तपदे पदवीधर अंशकालीन उमेदवारांमधून भरण्यात यावी, असे सूचित करण्यात आले आहे. पदभरतीची प्रक्रिया संबंधीत नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत व माध्यमिक शाळेत विज्ञान केंद्र करण्याबाबत**

**(४०) ५०४८ (१०-०४-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक जि.प. कैंद्रीय व माध्यमिक शाळेत नाविन्य पूर्ण प्रयोगशाळा नसल्यामुळे तसेच अनेक जि.प.शाळेत प्रयोगशाळाच नसल्यामुळे विद्यार्थी विज्ञानाच्या प्रात्यक्षिक ज्ञानापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर शाळेत नाविन्यपूर्ण अद्ययावत प्रयोगशाळा निर्माण करण्याची मागणी दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास औसा तहसील कार्यालय, औसा येथे झालेल्या आढावा बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच प्रत्येक कैंद्रीय शाळेत नाविन्यपूर्ण अद्यावत प्रयोगशाळा व प्रत्येक शाळेत आवशकतेनुसार साधारण प्रयोगशाळा निर्माण करण्याबाबत किती निधीची आवश्यकता आहे व त्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०७-२०२०) :** (१) होय हे अंशत: हे खरे आहे.

(२) नाविन्यपूर्ण प्रयोगशाळेसाठी औसा तालुक्यांतर्गत खालील ५ शाळांना विज्ञान प्रयोगशाळेचे साहित्य उपलब्ध झालेले असून, परिसरातील सर्व मुलांना याचा लाभ देण्यात येतो व या उपक्रमापासून मुले वंचित राहत नाहीत.

(१) जि.प. प्रशाला नागरसोगा, २) जि.प.कैं.प्रा.शा. भेटा, ३) जि.प.कैं.प्रा.शा. शिवली, ४) जि.प.कैं.प्रा.शा. हसलगन, ५) जि.प.कैं.प्रा.शा.सेलु

इतर ५ प्रशालेमध्ये शिक्षण विभागांतर्गत पूर्वीची प्रयोगशाळा उपलब्ध आहे. तसेच साधारण प्रयोगशाळा निर्मितीसाठी सध्या समग्र शिक्षा योजनेंतर्गत प्राप्त निधीमधून शाळा स्तरावर सूचना दिलेल्या असून तालुकाअंतर्गत १२४ शाळांमधून विज्ञान प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करुन घेतलेले आहे.

इयत्ता १ ली ते ४ थी च्या शाळांना प्रत्येकी किमान रु.१५,०००/- व इयत्ता ७ वी ते ८ वी च्या शाळांना प्रत्येकी किमान २५,०००/- निधीची आवश्यकता आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातून स्थलांतरित झालेल्या कामगारांच्या मुलांना वसतीगृह सुरू करण्याबाबत**

**(४१) ५०८७ (१०-०४-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातून तात्पुरत्या कामासाठी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या मुलांना जिल्हयात किंवा राज्यात हंगामी वसतीगृह नसल्याने त्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे दिनांक १७ डिसेंबर, रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ग्रामीण भागातील स्थलांतरित कामगारांच्या पाल्यांसाठी हंगामी वसतीगृह सुरू नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१८-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांच्या दिनांक १६.१०.२०१९ च्या परिपत्रकातील सुचनेनुसार स्थलांतरीत पालकांच्या पाल्यांची संख्या विचारात घेऊन मंगळवेढा तालुक्यात २ अनिवासी हंगामी वसतीगृह दिनांक ११.१२.२०१९ व सांगोला तालुक्यात ७ अनिवासी हंगामी वसतीगृहे सुरू केलेली आहेत. सांगोला तालुक्यात ६३६ व मंगळवेढा तालुक्यात २०० विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागातील राष्ट्रीय पेयजल योजनेबाबत**

**(४२) ५१४१ (०७-०४-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागात राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत अनेक नळ पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित पेयजल योजना तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०७-२०२०) :** (१) संकेत स्थळाप्रमाणे विविध टप्प्यात आहेत.
(२) प्रलंबित असलेल्या २२९ पाणी पुरवठा योजनांपैकी माहे मार्च २०२० अखेर १८३ योजना आर्थिकदृष्ट्या पूर्ण झाल्या असून, ४६ योजना प्रलंबित आहेत. सदर ४६ पाणी पुरवठा योजना जल जीवन मिशनच्या आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या सर्व योजना या कार्यक्रमांतर्गत पूर्ण करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील स्वस्त धान्य मेहकर येथील शासकीय गोदामात न देता परस्पर विक्री होत असल्याबाबत**

**(४३) ५२९८ (०७-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथून आलेला स्वस्त धान्य दुकानाचा माल हा मेहकर येथील शासकीय गोदामात न देता व मालाचे प्रमाणीकरण न करता परस्पर विकला जात असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मेहकर तालुक्यात धान्याचा पुरवठा विलंबाने होऊन लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१९-०५-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) दि. ८ जानेवारी, २०२० रोजी मेहकर, गोदामपालक शासकीय धान्य गोदामातून धान्य वाटप न करता गोदामाबाहेरुन द्वारपोचच्या वाहनातून करीत असल्याने दिसून आले. तहसिलदार, मेहकर यांनी सदर प्रकरणात चौकशी करुन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला. तद्नंतर तत्कालीन गोदामपालक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. तसेच वाहतूक कंत्राटदार यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील तरुणांचे कर्जाचे प्रस्ताव बँका फेटाळत असल्याबाबत**

**(४४) ५३३३ (२३-०४-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून अनेक तरुण हजारो रुपये खर्च करून प्रस्ताव बँकेकडे सादर करतात परंतु त्या बँकेमध्ये असलेले हिंदी भाषिक अधिकारी जाणीवपुर्वक मराठा समाजातील तरुणांच्या प्रस्तावांमध्ये विविध कारणे सांगून कर्जाचा प्रस्ताव फेटाळून लावत असल्याची तक्रार जालना जिल्ह्यातील तरुणांनी महामंडाचे अध्यक्षांकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने जाणीवपुर्वक कर्ज प्रस्ताव फेटाळणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महामंडळाने स्टेट लेवल बँकर्स कमिटी, जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जालना जिल्ह्याचे लिड डिस्ट्रीक्ट मॅनेजर (LDM) यांच्या समवेत पत्रव्यवहार करुन राज्यातील सर्व

बँक शाखेमध्ये किमान एक मराठी भाषिक अधिकारी नियुक्त करण्याची विनंती केली आहे. तसेच महामंडळाचे अध्यक्ष जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना, संबंधित जिल्हा व तालुक्यातील बँक अधिकाऱ्यांना कर्ज प्रकरणे विहित कालावधीमध्ये निकाली काढण्याबाबत सूचना केल्या आहेत. तद्वतच संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या दरमहा होणाऱ्या बँकेच्या बैठकीदरम्यान महामंडळाच्या योजनांचा आढावा घेण्याबाबतच्या सूचनाही दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समग्र शिक्षा अंतर्गत नक्षलग्रस्त भागात काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मिळणेबाबत**

**(४५) ५४६७ (१०-०४-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समग्र शिक्षा अंतर्गत काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना नक्षलग्रस्त भागात काम करण्यासाठी प्रोत्साहन भत्ता देण्यात येत नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जीवन ज्योती अभियान प्रमाणे समग्र शिक्षा अंतर्गत काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी होत आहे, हे हीखरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) समग्र शिक्षा अंतर्गत विविध स्तरावर व्यवस्थापन व कार्यक्रमांतर्गत अधिकारी व कर्मचारी प्रतिनियुक्तीने, करार पध्दतीने व बाह्यसंस्थेमार्फत कार्यरत आहेत. भारत सरकारकडून राज्यास कार्यरत पदांच्या अनुषंगाने वेतन / मानधनाकरिता तरतूद उपलब्ध करण्यात येते. केंद्र शासनाच्या निकषानुसार देय असलेले मानधन करार कर्मचाऱ्यांना नियमित अदा करण्यात येते. तर प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना राज्य शासनाच्या नियमानुसार समग्र शिक्षा अंतर्गत वेतन अदा करण्यात येते. करार कर्मचाऱ्यांना मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नसल्याने व भारत सरकार इतर कोणत्याही भत्त्यापोटी तरतूद राज्यास उपलब्ध करत नसल्याने समग्र शिक्षा अंतर्गत नक्षलग्रस्त भागात काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद येथील हज हाऊसच्या कामाबाबत**

**(४६) ६२४८ (०६-०४-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औरंगाबाद येथे मुस्लीम अल्पसंख्यांक नागरिकांसाठी असलेले हज हाउस चे काम निकृष्ट दर्जाचे असून हज हाऊसची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हज हाऊसच्या दुरुस्तीचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने नागरिकांसाठी हज हाउस अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे व चौकशीत काय आढळून आले त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२२-०७-२०२०) :** (१) नाही, बांधकाम निविदेमध्ये नमूद तांत्रिक मानकानुसार प्रगतीपथावर आहे.

(२) हज हाऊसचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याने डागडुगीचा प्रश्न येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांना अनुदान व मान्यता देण्याबाबत**

**(४७) ६८११ (२३-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४५० औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांना सुमारे १० हजार कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा राज्य शासनाकडून दिनांक २५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांना मान्यता देऊन त्यांना अनुदान देण्याचा प्रस्ताव देखील शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अनुदान प्रस्ताव निधी व पदनिर्मिती अभावी अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अनुदान वाटप व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२६-०६-२०२०) :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.
(४) शासनाचे अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याचे धोरण नाही तथापि खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थांकरीता "प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना" लागू करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आय.टी.आय. मधील सेवाप्रवेश नियम सुधारीत करून अधिसूचित होईपर्यंत पदोन्नती प्रक्रियेस स्थगीती देण्याबाबत

**(४८) ६८५९ (०७-०४-२०२०). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आय.टी.आय. मधील निर्देशक, गटनिर्देशक संवर्गावर अन्याय करणारा गट ब सेवाप्रवेश नियम सुधारीत करून अधिसूचित होईपर्यत या पदाच्या पदोन्नती प्रक्रियेस स्थगीती देण्याबाबत राज्याचे मुख्य सचिव यांना दिनांक २४ डिसेंबर,२०१९ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य आय.टी.आय निर्देशक संघटनेनी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्देशक व गटनिर्देशक संवर्गातील अन्यायकारक गट ब सेवाप्रवेश प्रक्रियेस स्थगीती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१०-०६-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तां) या संवर्गातील सेवा प्रवेश नियम मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता त्यासाठी गठीत केलेल्या समितीमार्फत करण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरु आहे.
सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह विमा काढण्याच्या निर्णयाबाबत

**(४९) ६८८८ (१०-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात काही विदयार्थ्यांचा आई-वडीलांच्या मृत्युनंतर आर्थिक भार परवडणासारखा नसल्याने शिक्षणाचा मार्ग बंद होतो ही परिस्थिती विद्यार्थ्यावर ओढवू नये म्हणून आता राज्यातील सुमारे २ कोटी विद्यार्थ्याचा त्यांच्या पालकासह विमा शासनातर्फे काढण्यात येईल अशी घोषणा तत्कालीन शासनाने केली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विमा योजनेच्या माध्यमातून अशा विदयार्थ्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात येईल असेही शासनाने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घोषणेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) शहरात पतंगाच्या मांज्यामुळे एका मुलाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(५०) ७३६७ (१०-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) शहरात वसाड येथे हरीबाई प्राथमिक मराठी शाळेत इयत्ता पहिलीत शिकणा-या कु.वेदांत हेंबाडे या मुलाचा पतंगाच्या मांज्यामुळे मानेवर जखम होऊन मृत्यू झाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने सदर मृत मुलाच्या कुटूंबियांना विशेष बाब म्हणून आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
सदर घटना ही पतंगाच्या मांज्यामूळे घडलेली नसून पालकांच्या माहितीनुसार त्याचा मुत्यू हा ताप व चक्कर आल्याने उलटीमूळे नैसर्गिकरित्या झालेला आहे. व ही घटना रविवार, दिनांक १२.०१.२०२० रोजी झालेला आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.